स्थापना १९५८

वर्षे - ६४ वे

**The Thane District Central Co-op.Bank Ltd., Thane.**

**दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, ठाणे.**

**छत्रपती शिवाजी पथ, ठाणे. (पो.बॉ.न.१९).**

Reg.No.24917 Date 14th March, 1958. Email id:- support@thanedccbank.in

# नोकरभरतीची विस्तृत जाहिरात

दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्याखाली असलेले **ज्यु.बँकिंग असिस्टंट श्रेणीतील २३३ रिक्त पदे व शिपाई श्रेणीची ५५ रिक्त पदे** सरळसेवा पध्दतीने भरणेसाठी दिनांक २६/०८/२०२२ रोजीच्या **दैनिक सकाळ व ठाणे वैभव** या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यास अनुसरून जाहिरातीतील पदे भरणेकरीता बँकेस निवडसुची तयार करावयाची आहे. याकरीता पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात केवळ ऑनलाईन पध्दतीने बँकेच्या www.thanedistrictbank.com व thanedccbank.in या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

- **ज्यु.बँकिंग असिस्टंट :** परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये दरमहा रू.१५,०००/- ठोक वेतन अदा करणेत येईल.
- **शिपाई श्रेणी :** परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये दरमहा रू.१०,०००/- ठोक वेतन अदा करणेत येईल.

**टिप:-**

१) सदर पदांमध्ये कमी जास्त बदल होणेचा संभव आहे व याबद्दल उमेदवाराची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही. हे अधिकार बँकेने राखुन ठेवलेले आहेत.

२) परिक्षेसाठी भरलेले शुल्क ना परतावा (Non Refundable) राहील.

३) उमेदवाराने अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच सादर करावयाचे आहेत.

४) उमेदवाराने खाली नमूद केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव दि.२६/०८/२०२२ या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १. | **ज्यु.बँकिंग असिस्टंट पदासाठी पात्रता/ अर्हता**<br>उमेदवार शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा उमेदवारास संगणकीय ज्ञान असणे आवश्यक राहील. यासह उमेदवाराने शासन मान्य संस्थेतुन -MSCIT हा संगणक कोर्स उत्तीर्ण केला असला पाहीजे. अथवा महाराष्ट्र शासन निर्णय मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ दि.०४ फेब्रुवारी, २०१३ नूसार माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामधील पदविका/ पदवी धारक.<br>**वयोमर्यादा :** दि.२६/०८/२०२२ रोजी २१ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये. |
| २. | **शिपाई पदासाठी पात्रता / अर्हता**<br>उमेदवाराचे ८ वी उत्तीर्ण वा १० वी पर्यंतचेच शिक्षण ग्राहय धरणेत येईल.<br>**वयोमर्यादा :** दि.२६/०८/२०२२ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये. |
| ३. | **परिविक्षाधीन कालावधी : (Probation Period)**<br>निवड करण्यात आलेल्या उमेदवारांचा परिविक्षाधीन (हंगामी) कालावधी १ वर्षाचा राहील. परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये उमेदवाराची सेवा असमाधानकारक असल्यास सदर उमेदवारास सेवेत कायम करणे वा न करणेचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे. |
| ४. | **निवड कार्यपध्दती : ऑनलाईन परीक्षा -**<br>● **ज्यु.बँकिंग असिस्टंट पदांकरीता** ९० गुणांसाठी ऑनलाईन (Computer Based Exam) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. यामध्ये बँकिंग, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम |

| | |
|---|---|
| | १९६० व नियम १९६१, इंग्रजी भाषा, मराठी भाषा, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांचा समावेश असेल. परिक्षेचे माध्यम मराठी / इंग्रजी राहील.<br>● **शिपाई पदांकरीता** ९० गुणांसाठी ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. यामध्ये सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांचा समावेश असेल. परिक्षेचे माध्यम मराठी / इंग्रजी राहील. |
| ५. | **कागदपत्र पडताळणी -**<br>उमेदवारास परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबधित मुळ प्रमाणपत्राच्या प्राथमिक कागदपत्र पडताळणीसाठी बोलविले जाईल. त्यावेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्र पडताळणीमध्ये ऑनलाईन परीक्षेद्वारे पात्र होणा-या उमेदवारास बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस बोलविले जाईल. या प्राथमिक कागदपत्र पडताळणीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास तो मुलाखतीस पात्र राहणार नाही. **मुलाखतपत्र ऑनलाईन पध्दतीने संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाईल. मुलाखतपत्र** www.thanedistrictbank.com व thanedccbank.in **या संकेतस्थळावरून डाऊनलोड करावे.** मुलाखतपत्र डाऊनलोड करण्यास काही अडचण निर्माण झाल्यास support@thanedccbank.in या ईमेलद्वारे व +९१-७३०४६४२४०४ / +९१-७३०४६४१४०४ या हेल्पलाईनद्वारे संपर्क करावा. |
| ६. | **मुलाखत –** ऑनलाईन परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांना बँक धोरणानूसार भरावयाचे पद संख्येच्या १:३ या प्रमाणात ऑनलाईन परिक्षेचे गुणानुक्रमे १० गुणांसाठी मुलाखतीस बोलाविण्यात येईल. **उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो निवडीस पात्र राहाणार नाही.** |
| ७. | **उमेदवारांची अंतीम निवड सूची-** निवड समिती प्रतिनिधींनी मोजदाद केलेल्या मुलाखत गुणांची सरासरी (+) अधिक ऑनलाईन परिक्षेतील गुण असे एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे अंतीम निवड सूची व प्रतिक्षायादी तयार करण्यात येईल. अंतिम निवड यादीप्रमाणे/ गुणवत्ता यादीप्रमाणे पात्र उमेदवारांना परिविक्षाधीन कालावाधीकरीता नियुक्ती देण्यात येईल. |
| ८. | **पदांच्या निवडीसाठीची कार्यपध्दती, अटी व शर्ती -**<br>ऑनलाईन परिक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरीता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परीक्षा शुल्क, मुळ कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल, अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता (मुलाखत) करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल. |
| ९. | **सर्वसाधारण अटी :-**<br>१) उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा बॅकेच्या कार्यक्षेत्रातील केंद्रावर घेण्यात येईल. परीक्षा आवश्यकतेनुसार एका दिवसात एका किंवा एकापेक्षा अधिक सत्रांमध्ये घेण्यात येईल.<br>२) उमेदवारास इंग्रजी व मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>३) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शारिरीक क्षमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>४) उमेदवारांस दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे यांचे आदेशास आधिन राहून बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १० दिवसांचे आंत रूजू होणे आवश्यक राहील.<br>५) निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधीन (Probation) सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधीत उपरोक्तप्रमाणे श्रेणीनिहाय दरमहा नियमित वेतन देण्यात येईल. या कालावधीतील कामकाज व वर्तणूक विचारात घेऊन सेवेत कायम केले जाईल. |

| | |
|---|---|
| | ६) नियुक्तीपूर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला तसेच आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादीची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत त्यामुळे दिलेली नियुक्ती रद्द करणेत येईल. |
| १०. | **ऑनलाईन अर्ज व लेखी परीक्षा शुल्क भरण्याची पध्दत :**<br>१) प्रस्तुत पदांकरीता फक्त बँकेच्या अधिकृत www.thanedistrictbank.com व thanedccbank.in या संकेतस्थळावर विहीत ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/ अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना बँक जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.<br>२) पात्र उमेदवाराला ऑनलाईन(Online) अर्ज बँकेच्या www.thanedistrictbank.com व thanedccbank.in या वेबसाईटद्वारे दिनांक २६/०८/२०२२ ते दिनांक ०५/०९/२०२२ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.<br>३) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्र/ पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रतेबाबत खोटया माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करणेत येईल.<br>४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहीती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा वैगेरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.<br>५) उमेदवाराची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहाणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. परीक्षेच्या प्राथमिक चाळणीनंतर गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कागदपत्रे पडताळणी करीता पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.<br>६) उमेदवारांना एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करता येणार नाही. तसेच एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करणारा उमेदवार आढळल्यास अशा उमेदवाराचा अर्ज छाननी प्रक्रियेत अपात्र करून निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.<br>७) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना बँकेच्या www.thanedistrictbank.com व thanedccbank.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर ऑनलाईन अर्ज संकेस्थळावर दि.०५/०९/२०२२ रोजी पर्यंत उपलब्ध आहे. |

८) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर उमेदवारास बँकेच्या नजीकच्या शाखेत जाऊन परीक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे. ऑनलाईन अर्जात चलनाचा छापील क्रमांक, ट्रान्झेक्शन आय.डी. रक्कम भरल्याची दिनांक, परीक्षा शुल्क रक्कम भरलेल्या शाखेचे नांव भरणे अनिवार्य आहे. सदरचा मजकूर असत्य आढळल्यास उमेदवाराचा अर्ज परिक्षेपूर्वी बाद ठरविण्यात येईल. बँकेत रक्कम भरलेल्या चलनाच्या २ प्रतीपैकी उमेदवारास त्यांची स्वत:ची प्रत बँकेकडून परत मिळेल. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी/मुलाखत घेतली जाणार नाही. बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक २६/०८/२०२२ ते दिनांक ०५/०९/२०२२ रोजी पर्यंत सांय.४.०० वाजेपर्यंत राहील. यानंतर बँकेत परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही.

९) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चे अद्ययावत ३.५ सें.मी. × ४.५ सें.मी. स्कॅन केलेले छायाचित्र (Photo) व पाढं-या स्वच्छ कागदावर काळया शाईच्या पेनने स्वत: स्वाक्षरी करुन स्कॅन केलेली १.५ सें.मी.× ३.५ सें.मी. आकारातील JPG याप्रकारची स्वाक्षरी (signature) स्कॅन करुन www.thanedistrictbank.com व thanedccbank.in या संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. (छायाचित्र व स्वाक्षरीच्या स्कॅन केलेले ईमेजची फाईल साईज २० ते ३० केबी असावी. त्यापेक्षा मोठी फाईल अपलोड होणार नाही)

१०) ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि ०५/०९/२०२२ रोजी पर्यंत असून त्यानंतर संकेतस्थळावर अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल. ऑनलाईन परिक्षा शुल्क भरणा माहिती संकेतस्थळावर अद्ययावत (Update) करण्याची अंतिम दि. ०७/०९/२०२२ रोजी पर्यंत राहील. यानंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची व शुल्क भरण्याची लिंक बंद केली जाईल.

११) उमेदवाराने सर्वप्रथम संकेतस्थळावरील विस्तृत माहिती व सूचना वाचून घ्याव्यात त्यानंतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लीक (Click) करावे. आणि उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करून जाहिरातीत दिलेल्या सुचनांचे अवलोकन करून ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्याबाबत खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

*i)* *उपरोक्त नमूद संकेतस्थळावर ऑनलाईन परिक्षा अर्ज भरल्यानंतर संकेत स्थळावरच परिक्षा शुल्क भरण्याचे चलन उमेदवारांना प्राप्त होईल.*

*ii)* *ऑनलाईन परिक्षा शुल्क ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखांमध्ये चलनाद्वारे रोखीने भरणा करता येईल.*

*iii)* *सदर चलनाची प्रिंट काढून सदर परिक्षा शुल्क ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये परिक्षा शुल्क भरण्यासाठी चलन जमा करावे.*

*iv)* *बँकेच्या संबधित शाखेकडून सदर चलनाचा ट्रान्झेक्शन नंबर प्राप्त होईल.*

*v)* *सदर ट्रान्झेक्शन नंबर बँकेच्या संकेतस्थळावर जाऊन उमेदवाराने ऑनलाईन फॉर्मवर अपडेट करावा.*

*vi)* *ट्रान्झेक्शन नंबर अपडेट केल्यानंतर अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल. ऑनलाईन परिक्षा शुल्क चलन संकेतस्थळावर अपडेट करावयाची अंतिम दि.०७/०९/२०२२ राहील.*

*vii)* *उमेदवारांनी अर्ज बँकेच्या संकेतस्थळावरून स्वत:च्या माहितीसाठी डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.*

१२) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी

| | |
|---|---|
| | उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरतीप्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.<br><br>१३) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे ऑनलाईन परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.<br><br>१४) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/ नियुक्ती रद्द करण्यात येईल व बँकेची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.<br>१५) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.<br><br>१६) ऑनलाईन परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस /तोंडी परिक्षेस बोलविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.<br><br>१७) भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे/ पुढे ढकलने किंवा रद्द करणे, अशंत: बदल करणे, पदाच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार बँकेस राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार बँकेस राहील. याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.<br><br>१८) ऑनलाईन परीक्षा, कागदपत्रे छाननी इ, करीता प्रवेशपत्र (हॉल तिकीट), कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेतस्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/ कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. |
| ११. | **परीक्षा शुल्क –**<br>● ज्यु.बँकिंग असिस्टंट पदासाठी परिक्षा शुल्क रू.८००/- + रू.१४४/- (१८ % जी.एस.टी)<br>● शिपाई पदासाठी परिक्षा शुल्क रू.५००/- + रू.९०/- (१८ % जी.एस.टी)<br>सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा (Non Refundable) राहील. एकदा भरलेले परिक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही. परीक्षा शुल्क दि.ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखेत /विस्तारकक्षामध्ये चलनाद्वारे भरावयाची आहे. शुल्क भरण्याची अंतिम तारीख ०५/०९/२०२२ रोजी पर्यंत सांय. ४.०० वाजेपर्यंत राहील याची नोंद घ्यावी. |
| १२. | **विशेष सूचना :**<br>१) या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची नसली तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत. ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सुचना या केवळ बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. सदर माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. सदर भरती प्रक्रियेदरम्यान |

| | |
|---|---|
| | बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारी माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील. उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरतांना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड जतन करून ठेवणे आवश्यक आहे.<br><br>२) अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास त्यासाठी +९१-७३०४६४२४०४ / +९१-७३०४६४१४०४ या हेल्पलाईन क्रमांकावर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा. |

ठिकाण : ठाणे
दिनांक : २६/०८/२०२२

**मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष**
**दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे**